REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# बौद्ध धम्म परिषदा : धम्म प्रसारातील योगदानाची चिकित्सा



डॉ.प्रभाकर कोळेकर
सहायक प्राध्यापक, ए.आय.एच.सी. आणि आर्कोलॉजी विभाग
स्कूल ऑफ सोशल सायन्स,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,

तथागतानी बौद्ध धम्माचा प्रचार व प्रसार करणेकरिता पंचवर्गीय भिक्षुना उपदेश केल्यानंतर बौद्ध धम्म संघाची स्थापना झाली. स्वत: गौतम बुद्ध, त्याची शिकवण व संघाच्या प्रयत्नामुळे धम्माचा विस्तार वाढत गेला. धम्माचा प्रचार व प्रसारामध्ये धम्मसंघाने मोठ्याप्रमाणात योगदान दिले. संघाच्या या कार्याकरिता विविध प्रदेशामध्ये संघाचे सदस्य विखुरले होते. संघकार्यात विनयनियमाचे पालन करत आपल्या कार्याची पूर्तता करत कालातराने धम्माची सदस्य संख्या वाढत असताना संघात बुद्धांच्या शिकवणुकीच्या पालनावरुन व संघाचे बुद्धानंतर नेतृत्व कोण करावे? या दोन बाबीवरुन संघात भेद निर्माण झाला.

संघातील हा वाद बुद्ध हयात असताना झाला होता. विनय ग्रंथात संघभेद ही संज्ञा दिली आहे. आणि हे मातृहत्या किंवा पितृहत्या या पातकाच्या जोडीला मानले गेले. संघभेदाचा पहिला प्रसंग हा कोशंबी येथील भिक्षुसंघात घडून भिक्षुसंघातील एका सदस्याने विनय धर्माचा भंग केला, यामुळे त्याचे कृत्य इतर सदस्यांना आपत्तीजनक वाटले, परंतु अपराधी भिक्षुस आपला प्रमाद हा अज्ञानातून घडला असल्याचे वाटले आणि पुढे ती अपराधी कृती अपराधच नाही असे तो समजू लागला. यामुळे त्या भिक्षुस 'उकखेपन' (संघातून बहिष्कृत करणे) करण्याचे काही सदस्याने ठरविले. परंतु हे त्याचे कृत्य अज्ञानपणातून घडले असल्या कारणास्तव त्याबद्दल या भिक्षुस एवढी मोठी शिक्षा देवू नये असे त्यांनी आपले मत मांडले. त्याच्या युक्तीवादाच्या समर्थनार्थ अनेक भिक्षु त्यांच्या समवेत आले. यामुळे संघात दोन गट पडले.

हा मतभेद मिटवण्याकरिता स्वत: बुद्धांना हस्तक्षेप करावा लागला. प्रारंभी काही भिक्षुंनी बुद्धांची मध्यस्थीदेखील नाकारली तेव्हा बुद्धांनी उपदेश करताना म्हटले की, असे मतभेद धम्माच्या प्रसाराकरिता अनिष्ठ आहेत. तरीदेखील भिक्षुसंघातील हा वाद मिटत नव्हता नंतर बुद्धांच्या उपदेशाचा मान राखून हा वाद संपुष्टात आला.

संघातील वादासंबंधीचा दुसरा प्रसंग बुद्धांचा चुलतभाऊ देवदत्त संबधात आहे. देवदत्तास संघाचे नेतृत्व करण्याची इच्छा होती. परंतु बुद्धांनी संघास सर्वांना समान स्थान दिल्याने नेतृत्वाचा प्रश्नच निर्माण झाला नाही. यामुळे देवदत्तांने सतत संघात फुट पाडण्याचा प्रयत्न केला. बुद्धांनी दैनंदिन जीवनाकरिता संघाचे जे नियम बनवले होते. त्या नियमात सुधारणा करुन हे नियम अधिक कडक करावे असे देवदत्त म्हणाले होते. बुद्धांचा भर हा नियमापेक्षा मनशुध्दी व चारित्र्यसंपन्नतेवर अधिक होता. त्यामुळे देवदत्ताचे नियम बुद्धांनी पाळणे वैकल्पिक ठरवले. त्यामुळे देवदत्तांने संघत्याग करुन पाचशे भिक्षुसह आपला वेगळा असा पंथ काढला.[1]

संघभेदाचे हे प्रसंग उद्भवल्यानंतरही संघ हा बुद्धांच्या एकंदरीत व्यक्तिमत्वामुळे, संघनिष्ठा व पातिमोक्ख नियमामुळे एकसंघ राहू शकला, तथापि बुद्धांच्या महापरिनिर्वाणनंतर संघाचे नेतृत्व कोणाकडेच दिलेले नव्हते व आचारनियमांना लिखीत स्वरुपदेखील प्राप्त झाले नव्हते. यामुळे नियम, मार्गदर्शकाच्या आभावामुळे संघात मतभेदाचे विविध प्रसंग निर्माण झाले.

तथागत भगवान बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर (इ. स. पू. 543) कुशीनारानगरीच्या पूर्वेला 'मुकूटबंध' नावाचे चैत्य आहे तेथेच त्याच्यावर अंतिमसंस्कार पूर्ण झाला[2]गौतमबुद्धांच्या परिनिर्वाणाची बातमी सर्व संघसदस्य व इतर समकालीन परिवाज्रक सांप्रदायामार्फत विविध भागात पसरली महाकश्यप या स्थिवीरास एका निर्ग्रथ संप्रदायाच्या व्यक्ती शिष्याकडून ही वार्ता समजली. यावेळी चारिका करीत कुशिनारा नगरीकडे येत असताना 'सुभद्र' नावाच्या वुढपब्बजित (वार्धक्यात संघात प्रवेशित) उद्गारला, त्या वृध्द तपस्यापासून भिक्षु आता पूर्णपणे मुक्त झाले आणि स्वत:ला हवे तसे नकोतसे ते करु शकतात. म्हणून आता शोक करायला नको[3] असे विधान भिक्षु संघापुढे केले हे विधान महास्थिवर महाकश्यप याने एकेले व त्याचा मनात आले की सुभद्रासारखे भिक्षु असे विनय धर्माविरुध्द वागू लागले तर धर्माचा ऱ्हास होईल, म्हणून याकरिता तथागतांनी सांगितलेल्या उपदेशाचे व शिकवणुकीचे एकत्रित संकलन करुन धम्मनियमास लिपीबध्द करणे आवश्यक आहे. गौतम बुद्धांच्या उपदेशाचे संकलन करण्याकरिता धर्मपरिषद आयोजित करण्याची गरज भासू लागली. या कारणास्तव प्रथम धम्म परिषदेचे आयोजन करण्याचे ठरले.

स्वत: गौतमबुद्ध त्याचे समकालीन निकटवर्ती शिष्य व ज्यांना पूर्णत: धम्माची शिकवण, तत्वज्ञान, उपदेश समजलेला आहे असे भिक्षु संघातील सदस्य यांच्यामार्फत गौतमबुद्धांनी विविध प्रसंग व स्थान काळानुरुप धम्माचा उपदेश सामान्यजन उपासक व धम्म अनुयायांना केला होता. हे उपदेश, शिकवण, तत्त्वज्ञान व धम्मसंघाकरिता आखून दिलेल्या नियमाचे संकलन व संग्रह करण्याकरिता या धम्म परिषदेची गरज होती. तथागतांच्या निर्वाणानंतर पहिल्या धर्मपरिषदेची योजना करुन ती राजगृह येथे बोलवण्यात आली.

### प्रथम धर्मपरिषदः इ. स. पू. 487:

सुभद्र नावाच्या भिक्षुने बुद्धांच्या निर्वाणानंतर भिक्षुसंघापुढे केलेले विधान हे भिक्षुसंघाच्या व धम्माच्या बैठकीस एक प्रकारे आव्हान देणारे होते. जर अशा प्रस्तृत होणाऱ्या विचारांना जर वेळीच थांबविले नाही तर धम्म व शिकवण याच्या बद्दल सामान्यजनात अविश्वास निर्माण होईल म्हणून गौतम बुद्धांनी चर्चा, संवाद, उपदेश हे वर्तमान व भविष्य काळातील पिढींना मार्गदर्शक ठरण्याकरिता या विचारांचे संकलन होणे गरजेचे आहे. यापूर्वी संघ हा स्वयंशिस्त अशा व्यवस्थेत अनुशासीत होता, पंरतु आता संघविस्तार झाल्याने अनेक प्रवृत्तीच्या लोकांचा समावेश संघात झाल्याने संघ नियमांचे संकलन आवश्यक बनले आहे. यास्तव संघातील उपस्थित सदस्यांपैकी सर्वाच्या सहमतीने धम्म व संघ अधिक अनुशासीत करण्याकरिता संघाने धर्मपरिषदेचे आयोजन करण्याचे ठरविले.

बुद्धांनी कोणता उपदेश, कोणत्या ठिकाणी दिला, कोणासाठी दिला, कोणत्यावेळी इतकी स्पष्टता ठेवून जर बुद्ध वचनाचे संगायन केले तर बुद्ध वचनाची प्रामाणिकता हजारो वर्षानंतरही विश्वसनीय होईल.[4] बुद्ध वचनाचे आतापर्यंत केवळ मुखोद्गत स्वरुपात जतन केले जाई. परंतु परिषदमार्फत अत्यंत सावधपणे धम्म कर्तव्य समजून कोठेही कमीपणा राहू नये. या निश्चयाने धम्मवचन एकत्रित करण्याचे कार्य पवित्र ठरविले गेले.

या परिषदेमध्ये प्रारंभी 499 अर्हत पद प्राप्त केलेले सदस्य होते. आनंद ने अर्हतपदाची प्राप्ती केल्यानंतर त्याच्या समावेशानी ही संख्या 500 इतकी झाली. 500 भिक्षुचा या समुहासमवेत परिषदेचे राजगृह हे स्थान निश्चित केले गेले. मगधनरेश आजातशत्रुच्या सहकार्याने 'आषाढ शुध्दपौर्णिमेस' राजगृहातील वैभारगिरीच्या पाठीमागे 'सप्तपर्णी लेणी' या स्थळी धम्म परिषद आयोजित करण्याचे ठरले. भिक्षु वग्गीस आणि महाकोष्ठीत यांनी राजगृहात राहून परिषदेची पूर्वतयारी पूर्ण केली.

या प्रथम संगायनाचे अध्यक्ष म्हणून महास्थिवीर आर्यमहाकाश्यप यांची सर्वानुमते निवड झाली. धम्मपरिषदेच्या प्रथमदिनी राजा अजातशत्रुने आपल्या राणी वजिरासह येवून 500 भिक्षुना चीवर दान केले व यांनतर अध्यक्षस्थानी असलेल्या महाकाश्यपांनी परिषदेच्या कार्यास प्रारंभ केला.

महाकाश्यपाने उपालीस विनयाचे जास्त ज्ञान असल्याने त्यास प्रश्न विचारुन विनयनियमाचे संकलन केले. बौद्ध पंरपरेनुसार विनयाच्या सर्व नियमाची निर्मिती भगवान बुद्धांच्या मुखातून झाली असे मानले जाते. उपालीने या बुद्ध कालीन विनयाचे प्रारंभिक काळातील स्वरुपानुसार एकत्रित करण्याचे काम केले. बुद्धांनी कोणता नियम कोठे, कोणासाठी, विषयानुरुप सविस्तरपणे मांडण्याचे काम उपालीने केले. नियम उपनियम, नियमाच्या भंगातून होणारे गुन्हे त्यावरील शासन या संबंधी सविस्तर विवेचन उपालीने केले.

विनयग्रंथाचे पातिमोक्ख - भिक्षु पातिमोक्ख व भिक्षुणी पातीमोक्ख व विभंग, भिक्षु आणि भिक्षुणी विभंग, वीस खंधक आणि सोळा परिवार हे ग्रंथ म्हणजे विनयपीटक होय, भिक्षुचे नियम, नियमाचा भाग, त्याचे केलेले विश्लेषण म्हणजे विनय होय. विनय हा धम्मसंघाचा मुख्य गाभा असलेले त्याचे संकलन होणे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य धर्मपरिषदेने साध्य झाले.

विनयनियमाच्या संकलनानंतर महाकाश्यपकाने आनंदास धम्मसुत्तोच वर्णन व विवेचन करण्यास सांगितले. आनंदाने सुत्ताविषयी विवेचन करताना पुढील माहिती दिली. बुद्धांनी बोधीप्राप्तीपासून ते महानिर्वाणापर्यंत जवळजवळ 45 वर्षात 84000 स्कंद (विभाजन) उपदेश केले आहेत. त्या सुत्तामध्ये काही गेयकरण, गाथा, वेय्यकरण इतिवृत्तक, जातक, उदभूतधम्म, उदान किंवा वैदय्य असे नवांगाने परिपूर्ण असलेले 84000 उपदेश आहेत.[5] भगवंताचे गंधरुपात दिलेले उपदेश ते सुत्त आहेत असे सुत्त दीर्घ लघु व मध्यम आहेत, तर काही संयुक्त स्वरुपात आहेत, काही सुत्ते गेय्य स्वरुपात तर काही व्याख्याच्या स्वरुपात आहेत.

बुद्धांच्या मुखातून अचानक म्हणीप्रमाणे निघालेले उद्गार म्हणजे उदान होत असे ज्ञानमयी, प्रज्ञामयी 82 गाथाउदान आहेत. गौतम बुद्धांच्या तांेडून आलेले जे वृत्तांत आहेत त्यांना इतिवृत्तक असे म्हणतात, याचे देखील संकलन प्रथम परिषदेमध्ये झाले.

'जातक' म्हणजे 'जन्माने उत्पन्न होणे व जात म्हणजे जन्म उत्पत्ती? 'माणसाच्या मनाच्या अवस्थंाची उत्पत्ती.' जन्म यालाच पाली भाषेत जात म्हणतात त्या बद्दलच्या कथा, मनुष्य ह्याच जन्मात अनेक जन्म घेतो म्हणजे नाना प्रकारच्या मानसिक अवस्थामधून जातो. या अवस्थाचे म्हणजे बुद्धांच्या 547 अवस्थाचे कथारुपात विवेचन यात आहे. यात मनुष्याच्या कथा, वाचा, मन या प्रवृत्तीचे वर्णन असून अशा प्रवृत्तींना अवलंब करणाऱ्या अवस्थेत निश्चल स्थिर राहणे म्हणजेच बोधी प्राप्तीकरणे या विषयाची माहिती आनंदाने जातक कथासंदर्भात सविस्तर कथन करुन याचे संकलन केले.

उपाली आणि आनंदाने धम्मवचनाचे सविस्तर विवेचन केले. यात प्रामुख्याने दोन भाग आहेत. 1) धम्मवचन 2) विनयवचन

विनय वचनाचे संकलन करीत असता दीर्घ स्वरुपातील सुत्त दिघनिकायात जे सुत्त मध्यम स्वरुपाचे आहेत. मज्झिनीकायात तर मिश्र स्वरुपातील सुत्त हे संयुक्त निकायात समाविष्ट केले गेले. काही गणिती अंकाच्या स्वरुपातील सुत्तांचा समावेश अंगुत्तरनिकायात असे एकूण धम्माचे चार भागात संकलन केले गेले. त्याचप्रमाणे खुद्दक निकाय हा पाचवा विभागदेखील या व्यतिरिक्त केला गेला.

या परिषदेमध्ये धम्मवचन व विनयवचनाचे पाच निकायात केले गेलेले संकलन ही एक महत्त्वपूर्ण अशी उपलब्धी ठरली. सात महिने चाललेल्या या परिषदेच्या समारोपावेळी या संकलनाच्या संरक्षणाची जबाबदारी ही पुढील पाच अर्हतावर सोपविली गेली.

1) दिघनिकाय बग्गीस 2) मज्झिमनिकाय - बकुल 3) संयुक्तनिकाय महाकश्यप 4) अंगुत्तरनिकाय- अनुरुध्द 5) खुद्दकनिकाय-महाकात्यायन या अर्हताकडे सोपविण्यात आली.[6]

एकंदरीत या परिषदेने बुद्ध निर्वाणानंतर धम्म नियमाचे व उद्देशाचे संकलनाचे महत्त्वपूर्ण काम पार पाडले. त्याचप्रमाणे लिखीत स्वरुपातील हा संदेश, भावीकाळात जगास उपयुक्त ठरला. या परिषदेत उपालीने विनयमाचे संकलन, आनंदाने धम्मपाठाचे संकलन, आनंदाच्या वरील आक्षेपाना उत्तर, छन्न सारख्यास शिक्षा आणि त्याचा पश्चाताप या महत्त्वपूर्ण घटनांचा समावेश होता

## द्वितीय धर्म परिषदः

बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर 100 वर्षांनी ही द्वितीय परिषद वैशाली येथे भरविली गेली. या परिषदेचे अध्यक्ष 'सब्बकमिन' हे होते. ही परिषद आयोजित करण्यामागे महत्त्वपूर्ण कारण म्हणजे विनय नियमाविरुध्द वृज्जी धम्मसंघातील भिक्षुचे वर्तन होय. वृज्जी देशात चारिका करीत असता यश या भिक्षुस वैशाली नगरीमध्ये वृज्जी संघातील भिक्षु विनयनियमाचे पालन न करता खालील दहा गोष्टीचा प्रचार व प्रसार करीत होते असे निदर्शनास आले.

1) सिगीलोण कप्प: रिकाम्या शिंगात मीठ भरुन घेऊन जाणे, हे पात्रितिय कर्म 38 नुसार विरोधी होते. यानुसार भिक्षु ने खाद्यसंग्रह करुन नये.
2) द्वंगुल कप्प: डोक्यावरुन दोन बोटे सावली पुढे जाईपर्यंत भोजन करणे, पाश्चितीय कर्म 37 नुसार मध्यांनानंतर भोजन निषिध्द मानले जाई.
3) गाभांतर कप्प: एकाच दिवशी दुसऱ्या गावी जावून जेवन करणे हे पाश्चित्तीच कर्म 35 नुसार निषिध्द होते.
4) आवास कप्प: एकाच आवासाच्या ठिकाणी राहणाऱ्या भिक्षुने वेगवेगळ्या ठिकाणी उपोसथविधी पाळणे.
5) अनुमिति कप्प: कर्म केल्यानंतर संघाची संमती गृहीत धरुन कर्म करणे व नंतर संमती घेणे.
6) अर्चिण कप्प: आपल्या आचार्याने एखाद्या आचरणाचे उदाहरण आपल्यासाठी बनवले आहेत त्याचा उपासकामध्ये खोटा प्रचार करणे.
7) अमयित कप्प: भोजनानंतर ताक पिणे
8) जलोगीषान कप्प: ताडी, सिंदी, दारु इ. मादक द्रव्ये पिणे
9) आदसक निसिदन: काठ नसलेल्या चट्टई वापरणे
10) जातीरुपरंजत कप्प: सोने, चांदी यांचे दान स्वीकारणे

हे पाश्चितीय कर्म 96 च्या विरोधात होते.[7]

भदंत यशाने वृज्जी संघातील हे सर्व व्यवहार पाहिल्यानंतर त्यास विनय धर्माविरुध्द ठरविले. त्यामुळे वृज्जी धम्मसंघातील भिक्षुंनी यशाला सोने, चांदीचा वाटा देण्याचे प्रलोभन दाखविले परंतु त्यास त्याने विरोध केला. यामुळे यशास संघबहिष्कृत करण्याचे व संघातून बाहेर काढण्याचे वृज्जी संघाने ठरविले. या विरोधी यशाने कौसांबी येथे जाऊन तेथील संघापुढे वृज्जीसंघाच्या अधर्माचा वृत्तांत सांगितला. त्यावेळी अहोगंग पर्वतावर संभूत साणवासी नावाचा भिक्षुचे समर्थन प्राप्त केले, पश्चिमेकडील 60 व दक्षिणेकडील 88 अर्हतांना देखील यशाची बाजू योग्य वाटली. या सर्वाच्या सहमतीने महाविनयशील रेवत यांचा विचार याविषयी घ्यायचा ठरला. सहजाती येथे रेवत त्या भिक्षु समुहास भेटले.[8] व त्यांना वृत्तांत कथन करुन उपाय सुचवण्याची विनंती केली.

वृज्जीसंघास यश व त्यांच्या समर्थक भिक्षुसंघाने केलेल्या कृत्याची माहिती मिळाल्यानंतर वृज्जी भिक्षुसंघाने सोरेय्यवासी रेवत यांना आपल्याकडे वळविण्याचे प्रयत्न चालविले. यशाचा हा वृत्तांत ऐकल्यानंतर रेवत भिक्षुनी वृज्जी संघाने केलेली 10 कृत्ये ही धम्म नसून अधम्म व अवकृत्ये आहेत असे मत मांडून त्यास निषिध्द मानले.

या वादाचा निवाडा लावण्याकरिता वैशाली येथील वयोवृध्द महास्थिवीर सर्वकामी (सब्बाकमी) याच्या विहारात एकत्रित येण्याचे ठरले. त्याच्या समक्ष सर्व अधिकरणाचा एखादा वृत्तांत कथन केल्यानंतर वैशाली येथे धम्म परिषद घेण्याचे ठरले.

बुद्धानंतर 100 वर्षानंतर ही दुसरी धम्मपरिषद संपन्न होत होती. या 100 वर्षात धम्मसंघात पूर्वेकडील पश्चिमेकडील वाद मतप्रवाह निर्माण झाले, तो वाद मिटवण्याकरिता व संघनियमात सुसूत्रता आणण्याकरिता ही परिषद आवश्यक होती. वैशाली येथे सब्बकामी याच्या अध्यक्षतेखाली ही परिषद घेण्याचे ठरले. परिषदेच्या वेळी वाद उत्पन्न होऊ नये म्हणून, प्राचीनक पक्षाचे व पावयेक पक्षाचे प्रत्येकी चार असे आठ सदस्याची लवाद नेमला गेला व त्यांचा नियम संघाने मानावे असे ठरले.

वैशाली येथील बालुकराम विहार हे परिषदेचे स्थान निश्चित केले.[9] भिक्षु अजित यांना स्थान नियंत्रक बनवले गेले.49 या परिषदेत 700 अर्हत भिक्षु सहभागी झाले. वैशालीचे महाराज नंदवर्धन (कालशोक) यांच्या सहकार्याने हे कार्य पार पाडले जात होते.

धम्म परिषदेमध्ये प्रत्येक मतप्रवाहाच्या चार चार सदस्याच्या लवादासमक्ष परिषदेची कार्यवाहीस प्रारंभ झाला. वृज्जी संघाने केलेल्या अवकृत्य अधर्माचा 10 बाबीविषयी चर्चा घडून आली. परिषदेत या सर्व 10 बाबी अधर्म विनयविरुध्द बुद्ध धर्माच्या शासनाबाहेर आहेत असे निश्चित केले गेले.[10] पुढे असे कार्य होऊ नये अशी प्रतिज्ञा घेतली गेली. हा भिक्षुसंघात निर्माण झालेला हा वाद शांत झाला व दुसरी धम्मपरिषद संपन्न झाली. या परिषदेमध्ये 700 भिक्षु एकत्रित आले असले तरी सुत्त व अभिधम्मपिटकाविषयी या परिषदेत कोणते कार्य संपन्न झाले याचा उल्लेख आढळत नाही.[11]

या धम्मपरिषदेचा निर्णय वृज्जी संघातील भिक्षुंना न पटल्यामुळे त्यांनी आपली स्वत:ची अशी वेगळी महासंगिती आयोजित केली. अर्हतपद प्राप्त व इतर अनुयायी असे एकत्रित दहा हजार भिक्षु या संगितीत सहभागी होते. महासांगिकांनी या संगितीमध्ये जुने धर्मशास्त्र बदलून नवधर्मशास्त्र निर्माण केले व त्या संगितीपासून वृज्जी संघाचे मत अनुकरण करणारे वर्गास 'महासांसीक' ही संज्ञा प्राप्त झाली. एकंदरीत दुसऱ्या धम्म परिषदेमध्ये बौद्ध धम्मसंघात फुट पडून दोन विभाग पडले, आचरण, चालीरितीमुळे थेरवाद आणि महासांघिक हे दोन पंथ निर्माण झाले थेरवादी याचाच अर्थ स्थिविरवादी, स्थिविर म्हणजे वृध्द किंवा म्हातारा वरिष्ठ भिक्षु जे परंपरागत बौद्ध विचाराचे काटेकोरपणे पालन करत.

बुद्धानंतर साधारणत: 108 वर्षानंतर धम्मसंघात फुट पडत गेली व धम्म विविध अशा सांप्रदायात विभागला गेला नंदवर्धन राजापासून ते मौर्यसम्राट अशोकापर्यंत बौद्ध धम्मसंघात 18 पंथ निर्माण झाले होते हे सर्व पंथ उपरोक्त दोन मुख्य पंथातून उदयास आले होते.

दुसऱ्या धम्मसंगितीनंतर धम्मसंघात प्रामुख्याने थेरवा व महासाधिक हे दोन प्रमुख पंथ निर्माण झाले होते. या प्रमुख पंथात आचार पध्दतीवरुन विविध उपपंथ निर्माण होऊन एकूण 18 उपपंथ निर्माण झाले. या 18 उपपंथापैकी 6 उपपंथ हे महासांधीक पंथाचे होते.

1) गोकुलिक 2) व्यवहारिक 3) प्रज्ञाप्तिवादी 4) बाहुलिक 5) चैत्यवादी 6) लोकोत्तरवादी

या पंथाचे भिक्षु बुद्धास लोकोत्तर पुरुष मानत व बुद्ध एक चमत्कारी पुरुष होते अशी त्याची मान्यता होती. स्थितिरवादी पंथात 12 उपपंथ निर्माण झाले.[12]

1) स्थिविरवादी 2) महिंशासक 3) वज्जीपुत्तक 4) सर्वास्तवादी 5) धम्मगुत्तिक 6) कास्यपीय7) सौत्रांतीक 8) सुन्तवादी 9) धम्मत्तरीय 10) भद्रायनिक 11) धम्मगारिक 12) सम्मतीय हे पंथ निर्माण झाले.

### तृतीय धम्म परिषद: (इ. स. 240)

उपरोक्त 18 उपपंथामुळे बौद्ध धम्मात सम्राट अशोकांच्या कालखंडापर्यंत मोठ्या प्रमाणात दुही निर्माण झाली होती. मुळ तत्त्वज्ञान, आचरणात, दैंनंदिन जीवन जगण्यात मोठ्या प्रमाणात भेद निर्माण झाला होता. संघात प्रादेशिक पातळीवर भेद निर्माण झाले होते. त्यामुळे तत्त्वज्ञान व शिकणुकीच्या पातळीवर गोंधळ निर्माण झाला होता. अशाच वेळी मगध राजवटीवर सम्राट अशोकाचे राज्य होतेे व कलिंग युध्दांनंतर भेरीघोषाचा मार्ग सोडून धम्म घोषाचा मार्ग अशोकाने स्वीकारला व सम्राटाने बौद्ध धम्मास राजाश्रय दिला व राजा भिक्षुच्या मार्गदर्शनाखाली बौद्ध धम्माचा उपासक बनला.

सम्राट अशोकाने बौद्ध धर्मास राजाश्रय दिल्यामुळे बौद्ध धम्मात नवचैतन्य निर्माण झाले. बौद्ध धर्मास राजाश्रय दिल्याने बौद्ध धम्माचा प्रसार सर्वदूर करण्याचा प्रयत्न केला. सम्राट अशोकाच्या काळानंतर धम्मात विविध संप्रदाय, प्रवाह व पंथभेद निर्माण झाले होते. तत्त्वज्ञानाचा गाभा सारखा असला तरी आचरणाच्या पध्दतीत मोठी तफावत निर्माण झाली. अनेक दोष धम्मात व संघात घुसखोरी करु पाहत होते. हे दांभिक व खोटे धम्माचरणी धम्माच्या खऱ्या स्वरुपास अत्यंत घातक होते. त्यामुळे सम्राट अशोकाने या दोषाचे निवारण करण्याकरिता उपाययोजना शोधण्याचा प्रयत्न केला व मोग्गलीपुत्त तिस्स याच्या अध्यक्षतेखाली तिसऱ्या बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन केले.[13]

भदन्त मोग्गलिपुत्ततिस्स हा मेधावी ब्राह्मण कुटूंबातील होता. त्यांच्या वडीलांचे नाव मोगली हे होते. थेर सिग्गवयांने त्यांना बौद्ध धम्माची दिक्षा दिली.[14] त्याचे नाव उपसपन्न झाल्यानंतर तिस्स ठेवले त्याच्या वडीलांचे नाव मोगली असल्याने ते मोग्गलीपुत्त तिस्स नावाने ओळखले जाऊ लागले. आपल्या सर्वगुणसंपन्नतेने ते पाटलीपुत्र भिक्षुसंघाचे प्रमुख झाले. भंदत आपले ध्यानासाठी अहोगंग पर्वतावर वास्तव्यास असत.

सम्राट अशोकाने धम्माचा स्वीकार केल्यानंतर राज्यात धर्म आचरणात गोंधळ माजला होता. धम्म विविध पंथ व सांप्रदायामुळे विभाजीत व अंतर्गतरित्या पोखरुन गेला होता. अशा प्रसंगी धम्मास आलेली ग्लानी दूर करण्याकरिता सम्राटाने मोगलीपुत्तास निमंत्रण पाठवले. मोगलीपुत्त तिस्स यांच्याशी चर्चाअंती धम्मातील दोषाचे निवारण

करण्याकरिता म्हणून धर्मसंगती / परिषद घेण्याचे ठरले. या परिषदेतून तत्त्वज्ञानातील खऱ्या खोट्याचा निवाडा करण्याचे योजले. भिक्षुसंघाची बैठक बोलावून 1000 स्थिविरांना निमंत्रित करुन बुद्ध वचनाचे व सुत्त व अभिधम्मपीटक याचे निश्चितीकरण करण्याचे ठरले. ही परिषद पाटलीपुत्र नगरीस 'अशोकरामात' झाली. परिषदेची पूर्वतयारी सम्राटपुत्र स्थिवीर महेंद्राने केली.[15]

या परिषदेमध्ये 1000 स्थिवीर सहभागी झाले होते. अशोकाच्या सहकार्याने पार पडणाऱ्या या परिषदेची सुरुवात करीत असताना मोग्गलीपुत्त तिस्साने परिषदेस संबोधून म्हटले की संघात अनेक अभिक्षु घुसले आहेत. त्याचे निष्कासन करणे व मूळ बुद्धादेश प्रकाशित करणे हा या परिषदेचा हेतू आहे. म्हणून माझी विनंती आहे की, जे भिक्षु नूसन केवळ सवलतीसाठी भिक्षु म्हणून वावरत आहेत व विनय व धम्म विकृत करीत आहेत त्यांना संघातून निष्काशीत केले जाईल. असा अपमान होण्यापूर्वी त्यांनी चूक कबुल करुन निघून जावे या एकाच आवाहनात 60,000 भिक्षु विनम्र होऊन निघून गेले.[16] त्यांना यापुढे संघास व धम्मास बाधा होईल असे कृत्य न करण्याचे आवाहन व तसे न केल्यास राजपद देण्यात येईल असे कळविले.

यानंतर या परिषदेमध्ये धम्मग्रंथाचे पुनंर्सगायन केले गेले. सुत्ताचे पाच भागात विभाजन केले. विनय पीटकाचे तीन भागात विभाजन केले, पातिमोक्याची भिक्षु व भिक्षुंणी करता विभागणी केली गेली. भिक्षुसंघाकरिता निदान कथा व 227 नियमाचे आठ विभागात विभाजन केले. भिक्षुणीकरिता निदानासह 311 नियमाचे सात भाग केले. अभिधम्माची सात भागात विभागणी केली, मोगलीपुत्र तिरसाने रचलेला कथावस्तु हा ग्रंथ अभिधम्मास जोडला धम्मवाङ्मयाचे या परिषदेनंतर 1) सुत्त पिटक 2) विनयपीटक 3) अभिधम्मपीटक असे विभाजन करुन त्यात सुसूत्रता आणली. सुत्ताचा अर्थबोध होण्याकरीता महाअठ्ठकथा, विनय समजण्यासाठी, कुरुदीन अठ्ठकथा, अभिधम्म समजण्याकरिता महापचरीय अठ्ठकथाची जोड दिली गेली.

तिसरी महत्त्वपूर्ण बाब या परिषदेत संपन्न झाली ती म्हणजे सम्राट अशोकाने धम्मानुरुप भिक्षु परंपरा प्रारंभ केली. स्वत:चा मुलगा मुलगी धम्मास देवून धर्मप्रसारात विनयशील व धम्मधर भिक्षु तयार करण्याची परंपरा स्थापन केली.[17] व धम्म त्यास प्रसाराकरिता विविध प्रातांत पाठविले. भारताबरोबरच भारताबाहेर धम्माचा प्रचार व प्रसाराकरिता स्थिविरांना प्रेरित केले हे या परिषदेचे मोठे वैशिष्ट्य होते. धम्मास राजाश्रय दिल्याने बौद्ध धर्म सम्राट अशोकाच्या काळात भारतवर्षाप्रमाणेच पूर्व अशिया व मध्य अशियात विस्तारीत झाला व बौद्ध धर्मास विश्वधम्माचे स्वरुप प्राप्त झाले.

### सम्राट अशोक ते चतुर्थ धम्म परिषद पर्यंतचा धम्माचा विकास:

सम्राट अशोकाच्या मृत्युपश्चात 300 वर्षाच्या काळानंतर चतुर्थ धम्मपरिषदेचे आयोजन राजा कनिष्काच्या काळात करण्यात आले. या 300 वर्षाच्या कालखंडात बौद्ध धम्म, आणि संघात मोठ्या प्रमाणात बदल घडून आले. धम्माचा प्रसार संबंध उत्तर भारतात झाला. बॅक्ट्रीया आणि चीन, सिलोन या भागात धम्माने अस्तित्त्व निर्माण करुन धम्मप्रसार केला.[18] या काळात अस्तित्वात असलेला मौर्य राजा पुष्यमित्र शुंगाकडून धम्म प्रसारात अवरोध निर्माण करण्याचे कार्य झाले. तथापि इ. स. पू. 2 ऱ्या शतकापर्यंत बौद्ध धम्माचा प्रसार उत्तर पश्चिमी भारत ग्रीक , बॅक्ट्रीयातील प्रदेशात मोठ्या प्रमाणात झाला. ग्रीक राज्यकर्ता मिनॅडर याने भिक्षु नागसेन याच्यांकडून दीक्षा घेऊन बौद्ध धम्म स्वीकारला व त्याच्या राजाश्रयातून बौद्ध धम्माचा प्रसार काबुल,कंदहार सिंध या भागात झाला.

कनिष्काच्या कालखंडापर्यंत बौद्ध धर्मात विविध प्रकारचे पंथ उदयास आले होते, याची सुरुवात उत्तर आणि दक्षिणेकडील संघाच्या दुसऱ्या बौद्ध धम्म परिषदेपासूनच झाली. बौद्ध धम्माचा प्रसार अशोकेत्तर काळात दक्षिणेतून सिलोनमध्ये मोठ्या प्रमाणात झाला. तेथील शासकांनी राजाश्रय दिल्याने धम्म, साहित्य, कला यात बौद्ध धम्माचे विशेष असे महत्त्वपूर्ण योगदान आजही सिलोनमध्ये आपणास पाहावयास मिळते.

एकंदरीत अशोकाच्या काळापासून ते कनिष्क राजाच्या काळापर्यंत बौद्ध धम्मात विविध महत्त्वपूर्ण स्थित्यंतरे घडून आली. धम्म विविध पंथात विभागला गेला, धम्मास राजाश्रय मिळाल्याने उत्तर व दक्षिण भारताप्रमाणेच धम्माचा प्रसार बॅक्ट्रीयन ग्रीक प्रदेशात तसेच सिलोन ब्रह्मदेश चीन तिबेट या प्रदेशातही धम्माने लोकप्रियता प्राप्त केली होती. धम्मात महासांघिक पंथाचे वर्चस्व वाढण्यास प्रारंभ झाला बुद्धांच्या विविध उपासना पध्दतीस प्रारंभ झाला, बौद्ध मूर्तीचे पूजन करण्याची परंपरा निर्माण झाली. मूर्तीपुजा करणाऱ्या महायान पंथाचा उदय कनिष्कांच्या झाला.

### चतुर्थधम्म परिषदः (इ. स. 1 ले शतक)

बौद्ध धम्माच्या सिध्दांताचे संकलन आणि त्याच्यावर भाष्य रचण्याकरिता चतुर्थ धम्म परिषदेचे आयोजन सम्राट कनिष्काने केले. या परिषदेचे आयोजन इ. स. 1 ल्या शतकात काश्मीर मधील कुण्डलनविहार नामक विहारमध्ये झाले तर काहीच्या मतानुसार ही परिषद जालन्धर येथे संपन्न झाली. युवानच्वॉग च्या मतानुसार ही परिषद काश्मीरमध्ये संपन्न  झाली.[19]

या परिषदेचा उद्देश बौद्ध सिध्दातांचे संकलन व भाष्यलेखन करणे हा होता. कनिष्काने ही परिषद पार्श्व नावाच्या वृध्द विद्वान भिक्षुच्या आदेशानुसार बोलवली. या परिषदेचे अध्यक्ष वसुमित्र होते तर अश्वघोष उपसभापती /उपाध्यक्ष होते या परिषदेमध्ये 500 भिक्षुंनी सहभाग नोंदविला.[20] या परिषदेमध्ये बौद्ध धम्मग्रंथाचे संकलन व संपादन करण्याचे कार्य हाती घेण्यात आले. त्रिपीटकाच्या तत्त्वज्ञानाचे संपादन करुन 'विभाषाशास्त्र' रचण्यात आले. विनयपिटकाची व्याख्या करुन त्यावर लाख गाथा रचल्या गेल्या. त्यात विनय विभाषाशास्त्र, अभिधम्माच्या, अभिधम्मविभाषाशास्त्र या रचना केल्या या रचनेकरिता संस्कृत भाषेचा प्रथमच उपयोग केला गेला.

या परिषदेमध्ये तयार झालेल्या विविध रचना या ताम्रपटावर कोरण्यात आल्या व एका दगडी पेटीत बंद करुन एका स्तुपाच्या आत ठेवल्या गेल्या.[21] परिषदेच्या समाप्तीनंतर कनिष्कांने काश्मीर राज्य संघास दान दिले

कनिष्काने आपल्या काळात बौद्ध धम्म प्रसाराकरिता अनेक विहारे बांधली.[22] कनिष्कपूर नामक शहर वसवले विशालस्तुप उभारले.

कनिष्कांच्या या चतुर्थ धम्म परिषदेने जे धम्मग्रंथ संकलनाचे कार्य केले त्याच्याशी संबंधीत ताम्रपट अद्याप प्राप्त झाले नसल्याने अधिक माहिती मिळण्यास मर्यादा पडतात. या धम्मा संगितीमध्ये स्थिवीरवादी भिक्षुंचा सहभाग जास्त होता. महायानपंथाचे प्रतिनिधी या परिषदेत समाविष्ट झाले नव्हते. या परिषदेत धम्मग्रंथाचे संकलन संस्कृतमध्ये करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडले.

## बौद्ध धम्म परिषदाचे योगदानाची चिकित्सा:

बुद्धांनी प्रतिपादीत केलेल्या धम्माच्या प्रसाराबरोबरच विविध पंथ प्रवाहाचा उगम धम्मात झाला.धम्मतत्त्वज्ञानाच्या व आचरणाच्या पध्दतीत भेद निर्माण झाल्याने संघात तेढ निर्माण झाली, बुद्धांची शिकवण व तत्त्वज्ञानाचे बुद्धांच्या हयातीत लिखीत स्वरुपात सुसूत्रपणे संकलन झाले नव्हते यामुळे संघातील भिक्षुच्या आचरणात काल व स्थळपरत्वे पध्दतीत भेद निर्माण झाले. या आचरणपध्दतीस मार्गदर्शक स्वरुपात असलेले नियम संकलीत करुन लिखीत स्वरुपात जतन करण्याकरिता व बुद्ध विचारंाचा ठेवा भविष्यातील पिढीस शुध्द स्वरुपात हस्तांतरीत करण्याकरिता बौद्ध धर्म परिषदाचे आयोजन केले.

बुद्धांच्या निर्वाणानंतर पहिल्या धम्म परिषदेपासून ते कनिष्कांच्या काळातील चतुर्थ धम्म परिषदेपर्यंत धम्मसंगितीमध्ये बुद्धांच्या शिकवणुकीचे, उपदेशाचे त्रिपीटकाच्या रुपात संकलन करुन पाली भाषेत लिखाण केले गेले. या लिखाणात बुद्धांचा उपदेश संवादरुपी कथन करुन तत्त्वज्ञानाचे जडत्व कमी करुन विविध दृष्टांताचा त्यात समावेश केला गेला. या परिषदाच्या संकलन कार्यात बुद्ध शिष्य अनुयायानी आपल्या स्मृतीनुसार व विवेकबुद्धीस साक्ष मानून यथातथ्य स्वरुपात बुद्ध उपदेश संग्रहीत केला. परंतु हे करीत असताना मानवी स्मृतीची मर्यादा लक्षात घेता काही भाग विस्मृतीस जाण्याची संभावना नाकारता येत नाही.

दुसऱ्या व तिसऱ्या धम्म परिषदेतील साहित्यात व परिषदेत स्थिवीरवादी पंथाचे वर्चस्व स्पष्टपणे जाणवते. या पंथाने महायान / महासांधिक पंथाची लोकप्रियता वाढू नये म्हणून बुद्धांची शिकवण व उपदेश अधिक ताठर स्वरुपात संकलीत करुन त्या संबंधित विविध असे टीकाग्रंथ लिहिले. जरी त्याच्या संकलीत साहित्याचा गाभा बुद्ध विचाराशी सुसंगत व प्रामाणिक असला तरी स्थिवीरवादी पंथापेक्षा महासांघिक पंथाची लोकप्रियता व जनपाठिंबा वाढत असल्याचे दिसून येत होती.

परिषदेच्या साहित्यिक रचना या विनय व धम्म उपदेश यात विभागणी करुन भिक्षुसंघ व सामान्य उपासक यांच्याकरिता उपदेश व निष्कर्षाचा ठेवा परिषदेने दिला. या परिषदांमध्ये रचलेल्या साहित्याची भाषा पाली असल्याने हे साहित्य सामान्य जनापर्यंत पोहचणे सुलभ बनले. यामुळे धम्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम भागात भारतभर झाला अशोक, मिलींद व कनिष्क या राज्यकर्त्याच्या सहकार्यामुळे धम्मपरिषदा आयोजित केल्या गेल्या अशोकाने आपल्या मुलामुलीस धम्माप्रती सर्मर्पित करुन धम्मप्रसारात योगदान दिले. कनिष्क, मिलींद, हर्षवर्धन या शासकांनी धम्माच्या प्रसारात विहार, स्तूप, धर्म परिषदा, प्रवेश दान देवून धम्म प्रसारात योगदान दिले.

धम्मपरिषदांच्या आयोजनातील मुख्य हेतूपैकी एक धम्मातील पंथभेद मिटवणे हा होता. प्रथम तृतीय परिषदामध्ये पंथभेद मिटवून संघ एकसंघ ठेवण्याचा प्रयत्न झाला. परंतु द्वितीय संगितीपासून संघात जो भेद निर्माण झाला तो भेद मिटवण्यास या परिषदा अपयशी ठरल्या. धम्मात 18 उपपंथाचा उदय झाल्याचे दिसून येते. या पंथाचे आचरण व दैंनदिन जीवन जगण्याची पध्दत जरी भिन्न असली तरी त्याचा गाभा हा बुद्ध उपदेश हाच होता. धम्म परिषदाचे आयोजन व समारोपात स्थिवीरवादी जरी वरचढ दिसत असले तरी या परिषदेमध्ये महासांघिक हे लक्षणीय संख्येने स्वत:च्या वेगळा वर्ग निर्माण करण्यात यशस्वी ठरल्याचे दिसून येते.

चारही धर्मपरिषदा ह्या बुद्धांच्या उपदेशाचे शुध्द रुपाबद्दल आग्रही असणारे स्थिवीरवाद्याची या परिषद आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका दिसते. याचाच अर्थ महासांघिक पंथ जनमानसात आपला लवचिक व लोक स्वीकार्य अशा धम्मविचारांमुळे लोकप्रिय होत होता. यास थांबविण्याकरिता स्थिवीरवादी आग्रही असल्याचे दिसतात, यामुळे पुढे हिनयान व महायान असे भेद निर्माण झाले. बुद्ध पुजा, पुर्वजन्म, प्रतिकांची पुजा यास महत्त्व मिळाल्याचे आपणास दिसून येते.

या परिषदाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये म्हणजे साहित्य रचण्याकरिता या विद्वान भिक्षुंनी जनसामान्याच्या पाली या भाषेचा उपयोग केला. चतुर्थ परिषदेमध्ये मात्र तत्कालीन काळात लोकप्रीय असलेल्या संस्कृत भाषेचा स्वीकार करुन धम्मविचार सर्वदूर पोहचविले.

एकंदरीत या परिषदेच्या योगदनाची चिकित्सा करीत असता असे लक्षात येते की, धम्मउपदेश, धम्मसंघातील पंथभेद व बुद्धाचे व्यक्तीमत्व सामान्यजनापर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या परिषदांनी केले. परिषदांचा उद्देश हा धम्म उपदेशाचे संकलन करणे व धम्मभेद मिटवणे हा होता. मात्र यात ते धर्मसंकलन व लिखाणात यशस्वी झाले. परंतु पंथभेदाचे निवारण करण्यात त्यांना मर्यादा पडल्या. धम्मात 18 पंथ निर्माण होऊन या पंथाचा धम्मास इ. स. 8-9 शतकापर्यंत भारतात व भारताबाहेर धर्मप्रसार करण्याकरिता या पंथानी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली.

## संदर्भसुची:


१. भदन्न तिस्सवंस, विनयपिटक बौद्ध धर्मग्रंथ - त्रिपीटकसार सुगत, नागपूर 2006 पृ.क्र.17
२. विनयपिटक चुलवग्ग (11-11) त्रिपीटकसार सुगत, नागपूर 2006 पृ.क्र.66
३. भदन्त तिस्सवस- विनयपिटक बौद्ध धर्मग्रंथ त्रिपीटकसार सुगत, नागपूर 2006,पृ.क्र.21,22
४. भदन्त तुस्सवंस, विनयपिटक, चुल्लवग्ग सुगत प्रकाशन, नागपूर 2006,पृ.क्र.22-23
५. भंदत तिस्सवस- त्रिपीटक बौद्ध धर्मग्रंथ त्रिपीटकसार सुगत, नागपूर 2006,पृ.क्र.166-169
६. बापट ,पी. बी. बौद्ध धर्म के 2500 वर्षे पब्लीकेशन डिव्हीजन 1956,पृ.क्र.30
७. विनय चुल्लवग्ग (12-1-1)
८. भंदत तिस्सवंस, विनयपिटक चुल्लवग्ग सुयत 2006पृ.क्र.274-275
९. किता पृ.क्र.279
१०. बापट, पी. बी. बौद्ध धर्म के 2500 वर्षे पब्लीकेशन डिव्हीजन, नवी दिल्ली 1956,पृ.क्र.31
११. किर्न एच, मॅन्युयल ऑफ इंडियन बुद्धीझम, मोतीलाल बनारसीदास 1989,पृ.क्र.105
१२. डांगे, सिंधू, बौद्ध धर्म आणि तत्त्वज्ञान पृ.क्र.131 कॉन्टीनेंटल 2008
१३. जोशी ग. ना. भारतीय तत्त्वज्ञान, बुद्धा इतिहास खंड 2 प्रकरण बुद्ध दर्शन शुभदा, सारस्वत प्रकाशन पुणे, पृ. क्र.205, 206
१४. किर्न एच, मॅन्युअल ऑफ इंडियन बुद्धीझम,मोतीलाल बनारसीदास 1989, पृ.क्र.110, 11,
१५. बापट, पी. बी. बौद्ध धर्म के 2500 पब्लिकेशन डिव्हीजन, नवी दिल्ली,पृ.क्र.32
१६. भदन्त तिस्सवंस, विनयपिटक बौद्ध धर्मग्रंथ, त्रिपीटकसार सुगतप्रकाशन, पृ.क्र.60
१७. किता पृ.क्र.60
१८. बापट, पी. बी., बौद्ध धर्म के 2500 वर्ष पब्लिकेश डिव्हीजन नवी दिल्ली,पृ.क्र.39
१९. किर्न एच, मॅन्युअल ऑफ इंडियन बुद्धीझम, मोतीलाल बनारसीदास 1989, पृ.क्र.118
२०. ऱ्हीस डेव्हीस, डब्ल्यु बुराल, युऑन चॉग इव्हल्स ईन इंडिया लंडन, पृ.क्र.208
२१. किर्न एच, मॅन्युअल ऑफ इंडियन बुद्धीझम मोतीलाल बनारसीदास ,पृ.क्र.121
२२. बापट, पी. बी, बुद्ध धर्म के 2500 वर्ष पृ.क्र.34